नि.दि.दावा क्र.८१/२०२५

मो.इसाक वि.मो.हशम.

## नि.क्र.२० वरील आदेश.

१. वादीतर्फे प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादीचे थोडक्यात कथन की, प्रस्तुत दाव्यात दावा चालु असतांना प्रतिवादी क्र. ६ यांनी सुभाष सदगुरे यांच्या हक्कात २६६२/२०२५ हे खरेदीखत नोंदवुन दिले. त्यामुळे प्रतिवादी क्र. ७ म्हणुन सुभाष सदगुरे यांना पक्षकार करणे तसेच त्यांच्या व्यवहाराबाबतची दुरुस्ती दाव्यात करणे, तसेच वादी क्र. १ ते ४ यांच्या नावात टंकलेखनातुन चुक झाली आहे त्याकरीत वादी क्र. १ ते ४ यांच्या नावात दुरुस्ती करण्याकरीता सदर दुरुस्तीचा अर्ज दाखल केला आहे.

३. प्रतिवादी यांचे सदर अर्जावर म्हणणे मागविण्यात आले. प्रतिवादी यांच्या मते वादी यांनी दुरुस्ती अन्वये नमुद केलेला दस्त अभिलेखावर दाखल केला नाही. करीता, सदर अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

४. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादींतर्फे विव्दान वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की वादी यांनी

सदरच्या अर्जात वादी क्र. १ ते ४ यांच्या नावात दुरुस्ती तसेच प्रतिवादी क्र. ६ यांनी दरम्यानच्या काळात प्रतिवादी क्र. ७ यांना वाद मिळतीतील काही क्षेत्र विक्री केल्याने त्यांना दाव्यात नव्याने पक्षकार करण्याची प्रस्तावित दुरुस्ती मागितलेली आहे. वादीने मागितलेल्या दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ रचनेत, दावेच्या कारणात व दावेकामी मागितलेल्या दादींमध्ये आमुलाग्र बदल होईल असे दिसत नाही. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात आला.

२. वादीने विहीत वेळेत दाव्यामध्ये दुरुस्ती करावी व दुरुस्तीनंतरची प्रत न्यायालयात सादर करावी.

स्वा/–

दि.१०.११.२०२५

(श्री.जी.एन.लंघे)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
बदनापूर.